इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्र:-नप्राशा-१००८/प्र.क्र.६७८/प्राशि-३

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -४०० ०३२, दिनांक १८ ऑगस्ट, २००९.

पहा:-१) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(४१८/०८)/माशि-१, दि.२९ एप्रिल २००८ व दि.१४ मे, २००८

२) शासन परिपत्रक,शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, नमाशा२००८/(५४६/०८)/माशि-१, दि.३ जुलै, २००८

**शासन निर्णय:**- शासन परिपत्रक दि.२९ एप्रिल २००८ अन्वये राज्यात कायम विनाअनुदान तत्वावर प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, सुरु करण्याकरिता खाजगी शैक्षणिक संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने **इंग्रजी** माध्यमाच्या प्राथमिक शाळा सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावांपैकी ज्या प्रस्तावांवर जिल्हा समिती व राज्य समिती, या दोन्ही समितीच्या शिफारशी आहेत अशा **१,१९० इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक शाळांना** सन २००९-१० पासून इयत्ता पहिलीच्या वर्गास (फक्त एका तुकडीस ) कायम विनाअनुदान तत्वावर व भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या शासन निर्णयासोबत संस्थेचो नावे व शाळेचे नाव व ठिकाण प्रपत्रामध्ये जोडली आहे.

२. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या या शाळांना कोणत्याही स्वरुपाचे अनुदान शासनाकडून देय असणार नाही.

३. शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर २००७ मधील तरतुदीनुसार सदर शासन निर्णयान्वये परवानगी देण्यात आलेल्या शाळा अठरा महिन्याच्या आत सुरु करणे बंधनकारक राहील. अन्यथा या शाळांचे परवानगी आदेश रद्द झाले आहेत, असे गृहीत धरले जाईल.

४. शासन पत्र दि.२१ जुलै, २००० मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या पुर्ततेच्या अनुषंगाने पडताळणी करुन सदर प्राथमिक शाळेस मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी व त्याबाबतचा सविस्तर अहवाल शासनास तातडीने पाठवावा.

५. कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी देण्यात आलेल्या सहपत्रात नमुद सर्व शाळांना शासनाच्या सर्व संबंधित कायदे व नियमांची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

६. सदर शासन निर्णय हा महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www/ manharashtra.gov.in) उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०८१८२१३४१३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( ना.ऊ. रौराळे )

उप सचिव महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री, यांचे खाजगी सचिव

मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

मा.मंत्री, (शालेय शिक्षण), यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण),यांचे खाजगी सचिव,

मा. सचिव, (शालेय शिक्षण व क्रीडा), यांचे स्वीय सहाय्यक

शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे

शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे

संचालक, राज्यशैक्षणिक संशाधन व प्रशिक्षण परिषद, पुणे

सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,

सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक),

सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.

सर्व प्रशासन अधिकारी महानगरपालिका, नगरपालिका, शिक्षणमंडळे,

अल्पसंख्यांक विकास विभाग मंत्रालय, मुंबई

ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई